# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक : 15.10.2026** **वार : गुरुवार**

---

## ठळक बातम्या

1. शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी 5 हजार रुपये जमा करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.
2. राज्यातील आणखी 40 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर.
3. अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना प्रत्येकी 2 हजार रुपयांची भाऊबीज.
4. 11 लाखांहून अधिक रेल्वे कर्मचाऱ्यांना सुमारे 18 हजार रुपये बोनस मिळणार.
5. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा सुचवण्यासाठी केंद्र सरकारकडून समितीची स्थापना.

## सविस्तर बातम्या

### राज्य मंत्रीमंडळ निर्णय

राज्यातल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर 5 हजार रुपयांचा अग्रीम जमा कर्ण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत काल घेण्यात आला. दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीनं हा निर्णय घेण्यात आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत सांगितलं. त्याचबरोबर राज्यातल्या आणखी 40 तालुक्यांना दुष्काळी म्हणून जाहीर करण्याचाही निर्णयही काल या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे राज्यातील दुष्काळी तालुक्यांची संख्या 305 झाली आहे.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलतांना याविषयी माहिती दिली. शेतकऱ्यांकडून कर्ज वसुलीसाठी कुठल्याही प्रकारचा तगादा लावण्यात येऊ नये, अशी सक्त ताकीद संबंधित सोसायट्या, जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांना दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

दुष्काळी तालुक्यातील विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क कोणतेही निकष न लावता सरसकट माफ करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जनावरांसाठीच्या चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत कालच्या बैठकीत आढावा घेण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घटनात्मक पदावरून केलेल्या जनसेवेला 25 वर्षं पूर्ण झाली म्हणून त्यांचं अभिनंदन करणारा ठराव काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला.

**मुख्यमंत्री-फडणवीस**

एमपीएससी परीक्षेतील पारदर्शकतेसाठी सरकार कटिबद्ध असून, यासाठी चौकशी समिती आणि व्ही. राधा समिती करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात दिली. परीक्षा प्रक्रिया वेळेत पूर्ण करून दरवर्षी जास्तीत जास्त पदांची भरती करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ही त्यांनी सांगितलं.

पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या आमदार आणि नगरसेवकांच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. यंदा कमी पावसामुळे ऊस उत्पादन घटण्याची शक्यता असून, साखर कारखान्यांनी 15 ऑक्टोबरपासून गाळप सुरू करावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

**वैद्यकीय महाविद्यालय मान्यता**

पुण्यातल्या ईएसआयसी रुग्णालयाला संलग्न वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल याबाबतची घोषणा केली. यानुसार 2027-28 या वर्षापासून 50 विद्यार्थीसंख्येसाठी हे महाविद्यालय सुरू होणार आहे. या निर्णयाबद्दल फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांचे आभार मानले आहेत.

*चांगली बातमी देतो आपल्याला माहिती आहे, की आपल्या ईएसआयसी हॉस्पिटलला मेडिकल कॉलेज करण्याकरता एक प्रस्ताव दाखल झाला होता. आणि दोन वेळा नॅशनल मेडिकल काउन्सिलने तो नाकारला होता. त्या संदर्भात माननीय केंद्रीय मंत्र्यांकडे आपण अपील दाखल केलं होतं. आजच माननीय केंद्रीय मंत्र्यांनी ते अपील मान्य करून एमबीबीएसच्या पन्नास जागांकरता एसिकच्या मेडिकल कॉलेजला मान्यता दिलेली आहे. त्यामुळे निश्चितपणे एक पुणेकरांची मागणी पूर्ण झालेली आहे.*

**सेवा संकल्प अभियान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सार्वजनिक क्षेत्रातील कारकीर्दीची 25 वर्ष पूर्ण करत आहेत. यानिमित्त सुरू असलेल्या विशेष वृत्तमालिकेत आज जाणून घेऊया **'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने'**विषयी...

*'आयुष्यमान भारत-प्रधान मंत्री जनआरोग्य योजना' 2018 मध्ये सुरु झाली आणि त्यानंतर गरिबी आणि आरोग्यसेवा यांमधील समीकरण बदललं. प्रत्येक कुटुंबाला 5 लाख रुपयांपर्यंत वार्षिक कॅशलेस संरक्षण देणारी ही योजना प्रथम देशातल्या 40% लोकांसाठी लागू झाली. योजनेची व्याप्ती टप्प्याटप्प्यानं वाढवण्यात आली आणि त्यामुळेच जून 2026 पर्यंत 37,413 सार्वजनिक आणि खाजगी रुग्णालयांमध्ये सुमारे 13 कोटी रुग्णांना दाखल करणे शक्य झालं. आयुष्यमान कार्डामुळे महिलांना आरोग्यसेवा मिळणं अधिक सुलभ झालं. आयुष्यमान कार्डधारकांमध्ये महिलांचा वाटा जवळपास 49% आहे. या योजनेची व्याप्ती पुढे वाढवण्यात आली. 'आयुष्यमान वय वंदना कार्ड'च्या माध्यमातून 6 कोटी ज्येष्ठ नागिरकांना त्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा विचार न करता समाविष्ट करण्यात आलं आहे. आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना लागू झाल्यामुळे दर्जेदार आरोग्यसेवा ही भारतीयांसाठी चैन न राहता आरोग्यपूर्ण जीवनाचा ती पाया ठरली. आकाशवाणी बातम्यांसाठी मेघना देशपांडे, पुणे.*

**पाणीपुरवठा-बावनकुळे**

राज्यातल्या दुष्काळी तालुक्यांत बंद असलेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू कराव्यात. पिण्याच्या पाण्यासाठी टँकर हा शेवटचा पर्याय ठेवून त्यापूर्वी अन्य सर्व उपाययोजना पडताळून पाहाव्यात, असे निर्देश महसूल मंत्री आणिं दुष्काळसंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. उपसमितीच्या बैठकीत ते काल बोलत होते.

अंगणवाडी सेविका

एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना दिवाळीपूर्वीच शासनाकडून भाऊबीज भेट म्हणून प्रत्येकी 2 हजार रुपये देण्यात येणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी काल दिली. राज्यात सुमारे 2 लाख 14 हजार अंगणवाडी सेविका आणि मदतनीस कार्यरत आहेत.

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय**

दिव्यांग व्यक्तींना आर्थिक मदत करण्याच्या निकषांमध्ये बदल करण्याचा निर्णय काल केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला. त्यानुसार जन्मापासून दिव्यांग आणि 40 टक्के दिव्यांग असलेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात येणार आहे. यापूर्वी ही मदत सज्ञान झाल्यानंतर 18व्या वर्षापासून मिळत होती. तसंच 80 टक्के अपंगत्व असलेल्यांनाच दिव्यांगजन संबोधलं जात होतं.

रेल्वेतल्या 11 लाख 40 हजाराहून अधिक कर्मचाऱ्यांना बोनस देण्याचा निर्णयही काल मंत्रीमंडळानं घेतला. या कर्मचाऱ्यांना कमाल 17 हजार 951 रुपये बोनस म्हणून मिळतील. याशिवाय IDBI बँकेतला 60 टक्क्यांहून अधिक सरकारी हिस्सा विक्रीलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. कॅनडाच्या फायरफॅक्स फायनाशियल होल्डिंग्सला 52 हजार 878 कोटी रुपयांना हा हिस्सा विकला जाईल. यानंतर केंद्र सरकार आणि एलआयसीचा एकंदरीत हिस्सा 34 टक्के असेल. अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

**समिती स्थापना**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांचं निराकरण करण्याच्या दृष्टीनं उपाययोजना सुचवण्यासाठी केंद्र सरकारनं एका समितीची स्थापना केली आहे. नीती आयोगाचे माजी सदस्य प्राध्यापक रमेश चंद या समितीचे अध्यक्ष असतील. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी, केंद्रीय कृषी मंत्री तसंच केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री यांच्यातल्या बैठकीत ही समिती स्थापन करण्याबाबत चर्चा झाली होती.

**धम्मचक्र प्रवर्तन दिन**

नागपुरात 70 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यासाठी दीक्षाभूमीवर अनुयायांची अलोट गर्दी झाली होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूरच्या ऐतिहासिक दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती. या ऐतिहासिक घटनेच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो आंबेडकरवादी अनुयायी आणि बौद्ध बांधव दीक्षाभूमीवर दाखल झाले होते.

**स्काऊट-गाईड**

राज्यातल्या सर्व माध्यमांच्या सुमारे 2 कोटी 10 लाख विद्यार्थ्यांना स्काऊट-गाईडचे प्रशिक्षण बंधनकारक करण्याचे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी काल दिले.राज्यातल्या सुमारे 17 लाख 33 हजार विद्यार्थ्यांना सध्या स्काऊट-गाईडचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाची व्याप्ती राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांपर्यंत वाढविण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

**साहित्य संमेलन**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या साहित्यिक, कवी आणि कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी पहिलं 'घुंगुरकाठी' जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलन 1 नोव्हेंबरला होणार आहे. ज्येष्ठ कवी डॉ. महेश केळुसकर संमेलनाध्यक्ष, तर ज्येष्ठ रंगकर्मी श्रीनिवास नार्वेकर उद्घाटक असतील. या संमेलनात मालवणी लोकसाहित्य परिसंवाद, कथाकथन, दशावतार कलावंताची मुलाखत, मालवणी कवितांचा नाट्याविष्कार आणि कविसंमेलन अशी सात सत्रे होणार आहेत.

**टेनिस स्पर्धा**

सांगलीत पाचव्या महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस मानांकन स्पर्धेचं उद्घाटन काल झालं. महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनच्या मान्यतेनं सुरज फाउंडेशन आणि सांगली जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांनी संयुक्तपणे या स्पर्धेचं आयोजन केलं आहे. या स्पर्धेसाठी राज्यातल्या विविध जिल्ह्यांमधून 700 खेळाडू सहभागी झाले आहेत.

**क्रिकेट**

हैदराबाद इथं काल झालेल्या चौथ्या टी ट्वेंटी सामन्यात वेस्ट इंडिजनं भारतावर 24 धावांनी विजय मिळवला. त्यामुळे पाच सामन्यांच्या या मालिकेत आता दोन्ही संघ 2-2 असे बरोबरीत आहेत. वेस्ट इंडिजनं दिलेल्या 248 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघ 223 धावाच करू शकला. मालिकेतला पाचवा निर्णायक सामना येत्या शनिवारी बंगळुरू इथं होणार आहे.

**हवामान**

राज्यात येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**